ePaper

## “मराठ्यांना सरसकट कुणबी दाखले नकोत”: नारायण राणे



| वर्ष - 7 | अंक - 133 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 15 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- बेन स्टोक्सने रचला इतिहास!
- मुन्नाभाई - सर्कीट पुन्हा एकत्र!
- आघाडीला सनातन संपवण्याची इच्छा!
- मुख्यमंत्री शिंदेंच्या शिष्टाईला मोठे यश!

# शिवमहापुराण कथा सोहळ्याची उत्कंठा शिगेला!

## » पंडित प्रदीप मिश्रा यांचे पिंपरी-चिंचवडमध्ये आगमन : सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर जय्यत तयारी

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रामध्ये प्रथमच पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठा विनामूल्य श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथा वाचन सोहळा पिंपरी-चिंचवडमध्ये होत आहे. त्यामुळे तमाम शिवभक्तांची उत्कंठा शिगेला पोहोचली असून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवकथा वाचक पंडित प्रदिप मिश्रा यांचे शहरात आगमन झाले. शहरवासीयांच्या वतीने त्यांचे भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी स्वागत केले.**



पिंपरी-चिंचवड शहरातील लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवारच्यावतीने श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथेचे आयोजन दि. १५ ते २१ सप्टेंबर २०२३ दरम्यान दुपारी २ ते ५ या वेळेत पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे केले आहे. परमपूज्य पंडित प्रदिप मिश्रा यांच्या सुश्राव्य वाणीतून हा अभूतपूर्व अध्यात्मिक सोहळा रंगणार आहे. हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिव पुराण कथा मोफत वाचन सोहळा आहे.

मध्यप्रदेश येथील प. पु. पंडित प्रदीप मिश्रा यांच्या अमोघ वाणीतून ही कथा ऐकण्याची संधी पिंपरी-चिंचवडवासीयांना मिळणार आहे. पंडित मिश्रा यांचे लाखो अनुयायी कथेचे श्रवण करण्यासाठी येणार आहेत. या दिवसांमध्ये सुमारे आठ ते नऊ लाख श्रोते या कथेचे श्रवण करतील. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता भव्य मंडप व संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी श्री शिव महापुराण कथा आयोजन समिती गठीत केली आहे.

> “ पिंपरी-चिंचवडसह पश्चिम महाराष्ट्रातील शिवभक्तांसाठी हा अलौकिक असा भक्ती-शक्तीचा महिमा आणि शिवपुराणाचे ज्ञान देणारा अध्यात्मिक सोहळा आहे. श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा वाचनासाठी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानात संपूर्ण तयारी झाली आहे. भाविक-भक्तांनी आणि साधकांनी या मोफत कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित रहावे. लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवार यांच्या पुढाकाराने होणारा या धार्मिक कार्यक्रमासाठी सर्व जाती-धर्मांच्या मान्यवर, नागरिकांना आम्ही निमंत्रित केले आहे.
>
> **–शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड**

### भाविकांच्या सुरक्षेची काळजी...

» कार्यक्रमासाठी आलेल्या भाविकांसाठी प्रशस्त व्यवस्था केली आहे. पार्किंग, सुसज्ज बैठक व्यवस्था, स्वच्छतागृह, रुग्णवाहिका, प्रथमोपचार सुविधा, जेवन, नाष्टा, शुद्ध पिण्याचे पाणी, अग्निशमन यंत्रणा, स्वच्छता नियोजन, सुरक्षा, पोलीस बंदोबस्त, भाविकांची निवास व्यवस्था, आपतकालीन व्यवस्था अशी जय्यत तयारी केली आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून शिवभक्त या कथा वाचन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. भाविकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यात आली आहे. कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व समाजातील धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते, खेळाडू आदींना निमंत्रित करण्यात आले आहे.

### तब्बल 12 एकर मैदानावर व्यवस्था...

»सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावरील तब्बल १२ एकर परिसरात या अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन केले आहे. आगामी सात दिवसात भाविकांचा मोठा राबता असणार आहे. यासाठी सुसज्ज असा सभामंडप बांधला असून यामध्ये सुमारे १ लाख भाविक एका वेळी बसून कथा ऐकू शकतील, अशी व्यवस्था आहे. सुमारे ५ ते १० हजार भाविकांचे ‘एक ब्रॅकेट्स’ अशी बैठक व्यवस्था आहे. यामुळे भाविकांची एकाच ठिकाणी गर्दी होणार नाही. तसेच अँब्युलन्स थेट मंचापर्यंत जावू शकेल अशा प्रकारे मंडपाची बांधणी केली आहे.

# श्री मंगलमूर्तींची भाद्रपद पालखी यात्रा उद्यापासून!

## » चिंचवडमध्ये मंगलमय वातावरण : तब्बल 525 वर्षांची परंपरा

**पिंपरी ।महाईन्यूज ।**

तब्बल ५२५ वर्षांची परंपरा लाभलेली, चिंचवड येथील श्रीमन् महासाधू मोरया गोसावी महाराज प्राप्त श्री मंगलमूर्तींची भाद्रपद पालखी यात्रा येत्या शनिवारपासून (दि. १६) सुरू होत आहे. २५ सप्टेंबरला यात्रेचा समारोप होईल, अशी माहिती देवस्थानचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव यांनी दिली.

भाद्रपद महिन्यात श्रीमंगलमूर्ती पालखीतून मोरगाव येथे नेण्याची ही परंपरा सुमारे गेली ५२५ वर्षा पेक्षा अधिक काळ अविरत चालू आहे.

पालखी प्रस्थानाच्या निमित्त मोठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. मिरवणुकीत अश्व अग्रभागी असतील.



### रविवारी पालखीचे प्रस्थान

» रविवारी (दि. १७) पहाटे साडेचार वाजता पालखी प्रस्थान ठेवेल. कार्यालयातून भवानीपेठ, रामोशी गेट, भैरोबा नाला, दिव्य वाटिका आश्रम, दिवेघाट, सासवड बाजारातून क-हाबाई मंदिरात दुसरा मुक्काम असेल, पालखी सोमवारी (दि.१८) सकाळी मंदिरातून शिवरी रासकर मळ्याच्या दिशेने निघेल. श्री क्षेत्र जेजुरी, मावडी, ढोले मळामार्गे मोरगाव येथे रात्री नऊ वाजता पालखी पोहोचेल.

# युवक काँग्रेसकडून भारत जोडो लीडरशिप!

## » विद्यार्थ्यांचे नुकसान करून पुण्यात तीन दिवस संघाची बैठक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय युवक काँग्रेसचे उद्दिष्ट युवकांच्या सक्षमीकरणाला चालना देणे आणि देशातील घटनात्मक आणि लोकशाही मूल्यांना चालना देणे हे आहे. लोकशाहीची मुळे मजबूत करण्यासाठी भारत जोडो लीडरशिप प्रोग्राम सुरू केला आहे.**



या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशाची लोकशाही आणि राज्यघटना वाचवण्यासाठी राजकारणात येऊ इच्छिणाऱ्या आणि तळागाळातून देश समजून घेण्यासाठी युवक काँग्रेसमध्ये सामील होऊ इच्छिणाऱ्या तरुणांपर्यंत पोहोचणे हा यामागचा उद्देश आहे असे मत पुणे युवक काँग्रेस मीडिया सेलचे चेअरमन अक्षय जैन यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले यावेळी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव डॉ. वैष्णवी किराड, पुणे शहर अध्यक्ष राहुल शिरसाट, पिंपरी चिंचवड अध्यक्ष कौस्तुभ नवले. जिल्हा अध्यक्ष महेश टापरे उपस्थित होते. जैन म्हणाले की, भारत जोडो यात्रेच्या एका वर्षाच्या प्रवासाची उद्दिष्ट देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी त्याच प्रवाहात आम्ही नेतृत्व कार्यक्रम आणला आहे. या कार्यक्रमात सहभागी होऊन देशातील तरुण आपण राजकीयदृष्ट्या सक्षम होऊ आणि आपल्या भविष्यासाठी अधिक चांगली धोरणे तयार करू शकू . जिथे इतर पक्षांचे नेते द्वेषाची बीजे पेरतात तिथे युवक काँग्रेस कार्यकर्ते म्हणून आम्ही शांततेचे रोप लावतोय. या देशातील तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. देशाचे पंतप्रधान तरुण पिढीसाठी 2 कोटी नोकऱ्यांची हमी देण्याचा दावा करतात. अक्षय जैन म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तीन दिवसीय बैठक पुण्यात एस.पी .महाविद्यालयात पार पडत आहे. या पार्श्वभूमीवर तीन दिवसांची सुट्टी विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. संघाच्या बैठकीस आमचा विरोध नसून शिक्षण प्रसारक मंडळ मध्ये ज्याप्रकारे विद्यार्थ्यांवर अन्याय करून जागा दिली गेली त्याला आमचा विरोध आहे. याबाबत कायदेशीर लढाई आम्ही लढणार आहे. त्याचसोबत याप्रकरणी पुणे विद्यापीठ यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात येणार आहे. शैक्षणिक संकुलात राजकीय कार्यक्रम घेतले जाऊ नये. आम्ही आंदोलन करण्याचा पार्श्वभूमीवर पोलिसांनी आम्हाला नोटीस दिली आहे. हर घर सावरकर या अभियानास आमचा विरोध आहे. या कार्यक्रमातून आम्ही एक व्यासपीठ तयार केले आहे प्रत्येक तरुणांना एकाच छताखाली येऊन लोकशाही आणि संविधानाचा आनंद घेता यावा यासाठी तयार करण्यात आले आहे. आम्ही सुरक्षेसाठी आमचा लढा आणखी मजबूत करू. भारत जोडो नेतृत्व कार्यक्रम हा भारतीय युवक काँग्रेसचा नवीन उपक्रम आहे. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत सक्रियपणे सहभागी होऊ इच्छिणाऱ्या तरुणांना सामावून घेण्यासाठी हा उपक्रम आहे. ज्या युवकांना 2024 च्या लोकसभा निवडणुकीत काम करायचं आहे. 2024 च्या निकालांवर या अशा पद्धतीने युवकांचा सहभाग नक्कीच बदल घडवेल. तरुणांना आणि विद्यार्थ्यांना एका छताखाली एकत्र आणण्यासाठी हा कार्यक्रम असणार आहे.

### विद्यार्थी नुकसान करून संघ बैठक

» अक्षय जैन म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तीन दिवसीय बैठक पुण्यात एस.पी .महाविद्यालयात पार पडत आहे. या पार्श्वभूमीवर तीन दिवसांची सुट्टी विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. संघाच्या बैठकीस आमचा विरोध नसून शिक्षण प्रसारक मंडळ मध्ये ज्याप्रकारे विद्यार्थ्यांवर अन्याय करून जागा दिली गेली त्याला आमचा विरोध आहे. याबाबत कायदेशीर लढाई आम्ही लढणार आहे. त्याचसोबत याप्रकरणी पुणे विद्यापीठ यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात येणार आहे. शैक्षणिक संकुलात राजकीय कार्यक्रम घेतले जाऊ नये. आम्ही आंदोलन करण्याचा पार्श्वभूमीवर पोलिसांनी आम्हाला नोटीस दिली आहे. हर घर सावरकर या अभियानास आमचा विरोध आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पुण्यात समन्वय बैठक

## » बैठकीस 36 संघटनांचे प्रमुख 267 पदाधिकारी सहभागी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय बैठकीला गुरवारी पुण्यात सुरूवात झाली. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पार्चन करून बैठकीस प्रारंभ झाला. बैठकीस 36 संघटनांचे प्रमुख 267 पदाधिकारी सहभागी झाले असून त्यांत 30 महिला आहेत.**



या बैठकीला उपस्थित असलेल्यांमध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्व सह सरकार्यवाह डॉ. कृष्णगोपाल, डॉ. मनमोहन वैद्य, अरूण कुमार,मुकुंदा आणि रामदत्त चक्रधर, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी, सुरेश सोनी, व्ही. भागैय्या, राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का, प्रमुख कार्यवाहिका अन्नदानम सीताक्का, 'महिला समन्वय' च्या वतीने चन्दाताई, 'स्त्री शक्ति'च्या अध्यक्षा शैलजा, राष्ट्रीय सेवा भारतीच्या महामंत्री रेणु पाठक, वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष रामचन्द्र खराड़ी उपस्थित आहेत. तर विश्व हिंदू परिषदेचे कार्यकारी अध्यक्ष आलोक कुमार, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष राजशरण शाही, भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, भारतीय किसान संघाचे संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी, 'विद्या भारती'चे अध्यक्ष रामकृष्ण राव, पूर्व सैनिक सेवा परिषदेचे अध्यक्ष लेफ्टनंट जनरल विष्णुकान्त चतुर्वेदी (निवृत्त), भारतीय मजदूर संघाचे अध्यक्ष हिरण्मय पंड्या, 'संस्कृत भारती'चे संघटन मंत्री दिनेश कामत यांचा समावेश आहे. तीन दिवसांच्या या बैठकीत सध्याची राष्ट्रीय व सामाजिक परिस्थिती, शिक्षण, सेवा, आर्थिक व राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा होईल. सामाजिक परिवर्तनाशी संबंधित पर्यावरण, कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, स्वदेशी आचरण तसेच नागरी कर्तव्याच्या विषयांना अधिक गती देण्यासंदर्भातील चर्चा होईल. संघटनेचा विस्तार आणि विशेष उपक्रमांच्या माहितीचेही आदानप्रदान करण्यात येईल.या बैठकीचा समारोप 16 सप्टेंबर रोजी होईल.

### खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा

» या बैठकीला उपस्थित असलेल्यांमध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्व सह सरकार्यवाह डॉ. कृष्णगोपाल, डॉ. मनमोहन वैद्य, अरूण कुमार,मुकुंदा आणि रामदत्त चक्रधर, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी, सुरेश सोनी, व्ही. भागैय्या, राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का, प्रमुख कार्यवाहिका अन्नदानम सीताक्का, 'महिला समन्वय' च्या वतीने चन्दाताई, 'स्त्री शक्ति'च्या अध्यक्षा शैलजा, राष्ट्रीय सेवा भारतीच्या महामंत्री रेणु पाठक, वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष रामचन्द्र खराड़ी उपस्थित आहेत.

# न्यायालयाच्या इमारतीला 'गती'!

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया

### पहिल्या टप्प्यात 4 मजली इमारत उभारणार


। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या बहुप्रतिक्षित इमारतीच्या उभारणीला आता गती मिळाली असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे 'व्हीजन- २०२०' अंतर्गत पाहिलेले आणखी एक स्वप्न पूर्ण होत आहे, अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.**



मोशी येथे पिंपरी-चिंचवड न्याय संकूल इमारत उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. त्यासाठी राज्य सरकारकडून एकूण ८६ कोटी २४ लाख ५१ हजार १६६ रुपयांच्या खर्चाला मान्यता मिळाली आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे प्रशासनाने ऑनलाईन निविदा प्रणालीद्वारे बी-२ नमुन्यातील अटीनुसार पात्र/ सक्षम कंत्राटदार/ संस्था/कंपनी यांच्याकडून निविदा मागविल्या आहेत. ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. ११ सप्टेंबर २०२३ ते दि. ३ ऑक्टोबर २०२३ असा आहे. इच्छुक कंत्राटदारांची निविदापूर्व चर्चा बेठक दि. २० सप्टेंबर २०२३ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे येथे होणार आहे. तसेच, निविदा उघडण्याची तारीख ५ ऑक्टोबर २०२३ अशी निश्चित करण्यात आली आहे. सर्व निविदा WWW.MAHAPWD.GOV.IN या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

दरम्यान, राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या अध्ययावत इमारतीचा अनेक वर्षे प्रश्न प्रलंबित राहिला होता. शहरातील वकील संघटना आणि विधितज्ज्ञांनी याबाबत शासनदरबारी वेळोवेळी मागणी केली होती. आमदार महेश लांडगे यांनी याकामी पुढकार घेतला. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात हा विषय लावून धरला. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात हा प्रश्न पुन्हा लांबणीवर पडला होता. त्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारची सत्ता स्थापन झाली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे नोव्हेंबर- २०२२ मध्ये न्यायालयाच्या इमारतीसाठी निधीची तरतूद करण्यात आली. तसेच, सल्लागार संस्थेचे नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर खऱ्या अर्थाने इमारतीच्या कामाला चालना मिळाली. आता महायुती सरकारच्या काळात निविदा प्रक्रिया करुन इमारतीच्या प्रत्यक्ष कामाला सुरूवात होणार आहे. अध्ययावत न्यायालय पिंपरी-चिंचवडकरांसाठी आगामी दोन वर्षांत उपलब्ध होईल.



Statement-1
GOVT. OF MAHARASHTRA
Public Works (Building) Division, Pune – 411 003
Phone No. 020/25817517
Web- www.mahapwd.gov.in & e-mail- buildingpune.ee@mahapwd.gov.in
E-TENDER NOTICE NO. 15 FOR 2023-24 (Online)
(Ref-Government of Maharashtra P. W. Dept. No. CAT-2017/P.K.8/Bldg.-2 Dt. 27/09/2018)

Executive Engineer, Public Works (Building) Division, Khadki, Pune – 411 003 (Govt. Milk Scheme compound) Pune. Invites online tenders in B-2 form from eligible bidders as per conditions of eligibility criteria mentioned in tender document for the following work of Government of Maharashtra Public Work Department. Bid Document can be downloaded from the portal http://mahatenders.gov.in

Executive Engineer reserves the right to accept or reject any or all tenders. Conditional tenders shall not be accepted.

| | | |
|---|---|---|
| 1 | Constrution Of Court Complex(Ground Floor + 4 Floor)(26 Court Halls) (Actual Proposed Lower Ground Floor + Ground Floor + 5 Floors) At Moshi, Pimpri Chinchwad. | Rs. 86,24,51,166.00 |

| | | |
|---|---|---|
| Downloading period of E-Tender | :- | Dt. 11/09/2023 to Dt. 03/10/2023 |
| Pre-Bid Mitting Date, Time & Address | :- | On Dt. 20/09/2023 at 12.00 hrs. (in the office of Chief Engineer, Public Works Region, Pune Central Building Premises) |
| Last date of Submition of E-Tender & time | :- | From Dt. 03/10/2023 up to 18.00 hrs. |
| Date & time of Opening of E-Tender | :- | Dt. 05/10/2023 at 10.00 hrs. onwards |

The detailed e-Tender Notice is available on following Websites.

1. www.mahapwd.gov.in
2. mahatenders.gov.in


(Any Changes made in e-Tender shall be informed on the above portals)

3. Notice Board in the office of the Executive Engineer, Public Works (Building) Division, Pune.

Out No. AB/TC/ 2022 /2023
Office of the Executive Engineer
Public Works (Building) Divison,
Govt. Milk Scheme, Khadaki, Pune
Date :- 01/09/2023

Sd/-
(U. S. Ghavte)
Executive Engineer,
Public Work (Building) Division,
Pune 411 003.

Signature Not Verified



### आणखी एक स्वप्नपूर्ती : महेश लांडगे



आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड न्यायालयाची अध्ययावत इमारत उभारावी, असा निर्धार आम्ही 'व्हीजन-२०२०' मध्ये केला होता. मोशी येथे या चार मजली प्रशस्त इमारतीचे बांधकाम होणार असून, त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे प्रशासनाने राष्ट्रीय स्तरावरील निविदा प्रक्रिया प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्काची न्यायालय इमारत दृष्टीक्षेपात आली आहे. शहरातील वकील संघटना आणि पक्षकारांच्या दृष्टीने निश्चितच ही समाधानाची बाब आहे. पीडब्ल्यूडी विभागाने निविदा प्रक्रियेचे कामकाज निर्धारित वेळेत पूर्ण करून इमारतीच्या कामाला सुरूवात करावी. नोव्हेंबर- २०२३ मध्ये इमारतीच्या कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थित व्हावे, अशी अपेक्षा आहे.

# दिव्यांगांच्या निरामय आरोग्य विमा कार्ड वितरण

## औंध जिल्हा रुग्णालयात कार्यक्रम : 108 पात्र दिव्यांगांना लाभ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय दव्यांग बांधवांना निरामय आरोग्य विमा कार्डचे वाटप करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समाज विकास विभाग, पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व महात्मा गांधी सेवा संघ यांच्या सयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 108 पात्र दिव्यांगांना हे वाटप करण्यात आले..**

नवी सांगवी येथील जिल्हा सर्वोपचार रुग्णालयातील प्रशिक्षण सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. या वेळी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाजविकास (दिव्यांग कक्ष) विभागाचे सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट, दिव्यांग वित्त विकास महामंडळाचे निवृत्त महाव्यवस्थापक नंदकुमार फुले, आरुष ट्रस्टच्या संचालक ऋषाली गंधे, पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या सल्लागार मिनिता पाटील, जिल्हा समन्वयक अशोक सोळंके, समुपदेशक हरिदास शिंदे,भौतिकोपचार तज्ज्ञ डॉ. संगीता गुंटूरे, सहाय्यक ईश्वर चाळक, तंत्रज्ञ ज्ञानेश्वर जाधव यांच्यासह दिव्यांग व्यक्ती व पालक मोठया संख्येत उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अशोक सोळंके यांनी केले. श्रीनिवास दांगट यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली.

नंदकुमार फुले यांनी कायदेशीर पालकात्वाची माहिती दिली. तर ऋषाली गंधे यांनी निरामय आरोग्य विम्याची माहिती दिली. हरिदास शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



### दिव्यांगांना प्रशासनाचे आवाहन...

**बौद्धिक अक्षम, सेरेब्रल पाल्सी, ऑटीझम, एकाधिक दिव्यांग ह्या चार दिव्यांग प्रवर्गासाठी राष्ट्रीय न्यासाच्या निरामय विम्याची देयक रक्कम पिंपरी महापालिका भरणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना 1 लाख रुपयापर्यंत आरोग्यविषयक खर्चाचा परतावा घेता येणार आहे. यामध्ये थेरपी खर्च, प्रवासखर्च,औषधीखर्च आदी बाबींचा समावेश आहे. विम्याची अर्ज भरण्याची कार्यवाही सुरु असून पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील पात्र दिव्यांगांनी पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या औंध येथील जिल्हा रुग्णालय परिसरातील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# बालेवाडीत रविवारी राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सेंट अन्स एज्युकेशन सोसायटी त्रिवेणीनगर, तळवडे यांच्या वतीने वायएमसीए यांच्या मान्यतेने व पीडीएएए पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी (दि. 17 सप्टेंबर) छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल, बालेवाडी येथे सकाळी साडे आठ ते साडे पाच या वेळेत 31 व्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती सेंट अन्स एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन सी. जे. फ्रान्सिस यांनी दिली.

संस्था मागील तीस वर्षांपासून जलतरण स्पर्धा यशस्वीपणे आयोजित करत आहे. जलतरणपटूंचा उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून राज्यातून जलतरणपटू स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येत असतात असे फ्रान्सिस यांनी सांगितले.


सहा वर्षांखालील मुले/मुली - 50 मीटर बेस्ट स्ट्रोक फ्री स्टाईल बॅक स्ट्रोक, आठ वर्षांखालील मुले मुली बेस्ट स्ट्रोक, बॅकस्ट्रोक,फ्रीस्टाइल बटरफ्लाय, दहा वर्षांखालील मुले मुली बेस्ट स्ट्रोक, बॅक स्ट्रोक, फ्री स्टाइल बटरफ्लाय, बारा वर्षांखालील मुले/मुली शंभर मीटर बेस्ट स्ट्रोक, बॅकस्ट्रोक, फ्रीस्टाइल बटरफ्लाय 200 मीटर तसेच 14 वर्षांखालील शंभर मीटर बेस्ट स्ट्रोक, बॅक स्ट्रोक, फ्री स्टाईल बटरफ्लाय 200 मीटर, सोळा वर्षाखालील शंभर मीटर बेस्ट स्ट्रोक, बॅकस्ट्रोक, फ्री स्टाईल बटरफ्लाय 200 मीटर; खुला गट 100 मीटर बेस्ट स्ट्रोक, बॅकस्ट्रोक, फ्रीस्टाइल; 200 मीटर बटरफ्लाय अशा प्रकारांमध्ये ही स्पर्धा घेतली जाणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी बालेवाडी येथे स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित रहावे. जास्तीत जास्त जलतरणपटूंनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे, आवाहन सेंट ॲण्ड एज्युकेशन सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘यांची’ चौकशी वि. ‘त्यांची’ चौकशी!




**अमेरिकेत पुढील वर्षी होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन पक्षांचे अधिकृत उमेदवार अद्याप ठरलेले नाहीत. पण हे उमेदवार अनुक्रमे जो बायडेन आणि डोनाल्ड ट्रम्पच असणार हे जवळपास निश्चित आहे. दोन्ही पक्षांची पंचाईत अशी, की ८० वर्षांच्या आसपास वय असलेल्या या दोघांना सशक्त पर्यायी उमेदवारच त्यांना अद्याप शोधता आलेला नाही.**





त्यामुळे २०२० मधील अध्यक्षीय निवडणुकीत लढलेले हे दोघेच पुन्हा २०२४ मध्येही लढतील, अशी शक्यता दाट आहे. तसे झाल्यास डोनाल्ड ट्रम्प यांची ही अध्यक्षपद लढतीची तिसरी वेळ असेल. त्यांच्या संकुचित आणि आक्रमक राष्ट्रवादी विचारसरणीमुळे रिपब्लिकन पक्षात त्यांना पर्यायच का उरलेला नाही आणि पक्षांतर्गत प्रतिस्पर्ध्यावरच दंडेली करत त्यांनी आपली पकड किती घट्ट केली आहे याविषयी भरपूर लिहून आले आहे. परंतु लोकशाही मूल्ये पक्षांतर्गत राजकारणातही आग्रहाने जपणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्षाला बायडेन यांचा प्रतिस्पर्धी मिळू का शकत नाही हा प्रश्नही उपस्थित झाला पाहिजे. रिपब्लिकन पक्ष एकचालकानुवर्ती असेल, तर डेमोक्रॅटिक पक्षात तरी अनेक नेते आणि इतर संभाव्य राष्ट्राध्यक्ष कुठे आहेत? अमेरिकेतील दोन प्रमुख पक्षांतील नेत्यांना ही बाब ठाऊक असल्यामुळे याच दोन नेत्यांच्या मागे न्यायालयीन किंवा काँग्रेस सभागृहांच्या चौकश्यांचा ससेमिरा सुरू झाला आहे. यात ट्रम्प यांचे ‘प्रताप’ फारच उच्च दर्जाचे असल्यामुळे त्यांच्या नावावर एकापेक्षा अधिक प्रकरणे वर्ग आहेत.

त्यातील काही गंभीर असून, कायदेशीर कारवाईच्या कचाट्यातून सुटका मिळण्यासाठी ट्रम्प यांना अध्यक्षपदाचे कवच महत्त्वाचे वाटते. बायडेन यांची प्रकरणे तुलनेने किरकोळ आहेत. त्यांचे चिरंजीव हंटर यांनी केलेल्या काही आर्थिक व्यवहारांबद्दल तपासयंत्रणांकडून चौकशी सुरू आहे. या व्यवहारांची माहिती बायडेन यांना होती, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याच मुद्द्यावर अमेरिकी प्रतिनिधिगृहाचे सभापती रिपब्लिकन पक्षाचे केव्हिन मॅकार्थी यांनी बायडेन यांच्यावर महाभियोग चालवण्याचा निर्णय घेतला. ट्रम्प यांच्यावरील खटले, चौकश्या सुरू आहेत म्हणून बायडेन यांनाही लक्ष्य करण्यासाठी हा महाभियोगाचा खटाटोप. मात्र मॅकार्थी यांनी हा निर्णय स्वेच्छेने नव्हे तर दबावापोटी घेतला आहे. हा दबाव त्यांच्यावर रिपब्लिकन पक्षातील कडव्या सदस्यांनी आणलेला आहे. याची काही कारणे आहेत. पण महत्त्वाचे कारण म्हणजे, मध्यंतरी सरकारी खर्चावर मर्यादा आणण्याच्या मुद्द्यावर मॅकार्थी यांनी बायडेन आणि डेमोक्रॅटिक पक्षाविरोधात पुरेशी कणखर भूमिका घेतली नाही, अशी कडव्या रिपब्लिकन सदस्यांची भावना आहे. या मुद्द्यावरून डेमोक्रॅटिक-रिपब्लिकन आमने-सामने आले होते आणि त्यामुळे सरकारी खर्च व देणी अदा करण्यासाठी निधीच शिल्लक राहणार नाही असा अभूतपूर्व पेच निर्माण झाला होता. त्या वेळी मॅकार्थी यांनी समेटकारी भूमिका घेतली. त्यामुळे आता तरी त्यांनी बायडेन यांना अडचणीत आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे कडव्या गटाला वाटते. विशेष म्हणजे रिपब्लिकन पक्षाने यापूर्वीच बायडेन यांच्या कथित भ्रष्टाचार व अधिकार दुरुपयोगाविरोधात चौकशी सुरू केली आहे आणि त्यांना आजतागायत काहीही आक्षेपार्ह सापडलेले नाही. त्यामुळे मॅकार्थी यांनी चालवलेल्या महाभियोग चौकशीतून काय हाती येणार असा प्रश्न आहे.सहसा महाभियोग चौकशीला प्रतिनिधिगृहात साध्या बहुमताने मंजुरी मिळावी लागते. मग हा प्रस्ताव सेनेटकडे जाईल. तेथे दोनतृतीयांश बहुमताने प्रस्ताव मंजूर व्हावा लागतो. प्रतिनिधिगृहात सध्या रिपब्लिकनांकडे साधे बहुमत असल्यामुळे प्रस्ताव सेनेटकडे पाठवण्यास मंजुरी मिळू शकेल. सेनेटमध्ये मात्र डेमोक्रॅट्सचे बहुमत असल्यामुळे बायडेनविरोधी महाभियोग प्रस्ताव मंजूर होण्याची सुतराम शक्यता नाही. महाभियोग मंजूर होणार नाही, हे रिपब्लिकन पक्ष ओळखून आहे. पण ट्रम्प यांना दोन वेळा सेनेटमध्ये महाभियोग सुनावणीला सामोरे जावे लागले होते. बायडेनही त्यांच्यापेक्षा वेगळे नाहीत, हे रिपब्लिकन जनतेसमोर मांडून दाखवायचे आहे. दोन संभाव्य सदस्यांना अमेरिकेच्या विकासासाठी कोणता कार्यक्रम सादर करायचा आहे यापेक्षाही, हे दोघे कोणत्या चौकश्यांमध्ये अडकलेले आहेत हा मुद्दा निर्णायक ठरावा यात अमेरिकी राजकारणाचा ऱ्हासही दिसून येतो. या खेळात ट्रम्प यांना सर्वस्वी दोषी ठरवण्यासाठी स्वत: सर्वस्वी निर्दोष राहण्याची खबरदारी बायडेन यांनाही घ्यावी लागेल.

## संपादकीय »

# नितीनभौ जरा दमाने..

***..या प्रयत्नांत काही गैर नाही, कारण पर्यायी इंधनांचा वापर वाढेल तितके पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व कमी होऊन आपले परकीय चलन अधिकाधिक वाचू शकेल.***

नितीन गडकरी यांच्या धडाडीस तोड नाही. एखादा मुद्दा त्यांनी मनावर घेतला की तो पूर्णत्वास नेल्याखेरीज ते थांबत नाहीत. देशातील महामार्ग बांधणी ही त्यांच्या धडाडीची पावती. भारतीय व्यवस्थेत रेटल्याखेरीज काहीही आपोआप होत नाही आणि सरकारी अधिकारी काही करून दाखवण्यापेक्षा ते न करण्यातच अधिक रस घेतात हा त्यांचा सिद्धांत. तो खरा नाही असे कोणीही म्हणणार नाही. विद्यमान केंद्र सरकारातील फारच कमी जणांस सर्व पक्षीयांशी सौहार्दाचे संबंध राखावेत असे वाटते आणि त्याहून कमी जणांस ते जमते. गडकरी अशा काही मोजक्यांत गणले जातात. त्यामुळेच त्यांच्या धडाडीचे कौतुक विरोधकही करतात आणि गडकरीही विकासाच्या मुद्द्यावर आपले आणि ‘त्यांचे’ असा दुजाभाव करीत नाहीत. तथापि या धडाडीच्या लाटेस आवर घालावा लागणे गडकरींस आवडत नाही. पण कधी कधी इलाज नसतो.

**जी-२० शिखर परिषदेनिमित्त नवी दिल्लीत आलेल्या जागतिक नेत्यांबरोबर सर्वोच्च पातळीवर द्विपक्षीय चर्चा हा महत्त्वाचा समांतर उपक्रम होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या नेत्यांबरोबर सविस्तर आणि भविष्यवेधी चर्चा केली, त्यात अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्यानंतर महत्त्वाचे नेते होते सौदी अरेबियाचे युवराज आणि धोरणकर्ते मोहम्मद बिन सलमान. त्यांच्या भारतभेटीदरम्यान दोन देशांमध्ये जवळपास ५० करार झाले.**

# सौदी मैत्रीचे बदलते रंग..!

भारत-सौदी संबंध ऊर्जा व्यवहारापलीकडे जायला हवेत आणि यासाठी सौदी अरेबिया भारतात मोठी गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे, असे आश्वासन मोहम्मद बिन सलमान यांनी दिले. तर सौदी अरेबियाशी व्यूहात्मक द्विपक्षीय संबंध वाढवण्यावर भर देणार असल्याचे मोदी यांनी म्हटले. त्यांचा रोख प्रामुख्याने जी-२० परिषदेच्या अंतिम मसुद्यात समाविष्ट झालेल्या भारत – पश्चिम आशिया – युरोप व्यापार मार्गिकेकडे (कॉरिडॉर) होता. हे झाले दीर्घकालीन प्रकल्प. पण विद्यमान किंवा नजीकच्या प्रकल्पांचे काय? सौदी सहकार्याने भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे कोकणात बारसू येथे अत्यंत महत्त्वाचा तेलशुद्धीकरण प्रकल्प होऊ घातला आहे. नाणार प्रकल्प म्हणून ओळखल्या गेलेल्या या प्रकल्पातील सौदी गुंतवणूक ५० अब्ज डॉलर्स (साधारण ४,१४,५०० कोटी रुपये) इतकी आहे. या देशाकडून प्रस्तावित १०० अब्ज डॉलर्स गुंतवणुकीपैकी अर्धी



तेलशुद्धीकरण प्रकल्पासाठी आहे. पण स्थानिक विरोध आणि राज्यातील पक्षीय राजकारण यामुळे नाणार येथून बारसू येथे सरकलेल्या या प्रकल्पासमोरील अनिश्चिततेचे ढग पुरेसे विरलेले नाहीत. त्यामुळेच प्रकल्पपूर्तीसाठी आता दोन्ही देशांमध्ये संयुक्त कृतिगट स्थापण्याचे ठरले. मोदी-सलमान भेटीचे हे एक महत्त्वाचे फलित. प्रकल्पाच्या प्रगतीवर हा गट देखरेख ठेवणार आहे. आतापर्यंत या मुद्द्यावर सौदी अरेबियाकडून थेट देखरेख ठेवली जाण्याचा विषय चर्चिला गेला नव्हता. आता द्विराष्ट्रीय नेते आणि शिष्टमंडळांच्या चर्चेच्या टेबलावर तो आला आहे. केंद्रात आणि राज्यात एकच सरकार असल्यामुळे सौदी अरेबियाच्या मदतीने हा प्रकल्प पूर्णत्वाला नेण्याचा आग्रह मोदींकडून होऊ शकतो. जगात जे मोजके देश सध्या सगळ्यांचेच मित्र म्हणवले जाऊ शकतात, त्यांच्यामध्ये भारत, कतार, तुर्की यांच्या बरोबरीने सौदी अरेबियाचे नाव घ्यावे लागेल. गेल्या दोन वर्षांमध्ये इस्रायल आणि गेल्या दोन महिन्यांमध्ये इराण या कट्टर शत्रूंशी जुळवून घेण्याचे धोरण सौदी अरेबियाने अंगीकारले आहे. संघर्षांतून किंवा इतर कोणत्याही कारणास्तव जागतिक व्यापारात पडणाऱ्या खंडाचा फटका सौदी अरेबियासारख्या प्राधान्याने खनिज तेल निर्यातदार देशांना बसतो. त्यामुळे जगभरात शत्रू निर्माण करत बसण्याचा सोस सौदी अरेबियासारख्या निर्याताभिमुख अर्थव्यवस्थेला परवडणारा नाही. मध्यंतरी ‘द वॉशिंग्टन पोस्ट’चे स्तंभलेखक जमाल खाशोगजी यांची हत्या घडवून आणल्याचा ठपका मोहम्मद बिन सलमान यांच्यावर अमेरिकेतील माध्यमे, विचारवंत आणि काही राजकीय नेत्यांनी ठेवला होता. त्यांची शंका बहुधा रास्तच होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्री शिंदेंच्या शिष्टाईला मोठे यश!

## जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण 17 व्या दिवशी मागे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळावे या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात उपोषण सुरू होते. अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंतरवाली सराटी येथे जात मनोज जरांगे यांचे उपोषण सोडले. या वेळी मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकारला 40 दिवसांचा वेळ दिला आहे. 17 दिवसांनंतर मनोज जरांगे यांचे उपोषण सुटले असून त्यांनी दवाखान्यात दाखल होण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विनंती देखील मान्य केली आहे.**



त्यानुसार मनोज जरांगे आता दवाखान्यात उपचार घेणार आहेत. मला शब्द दिलाय आज मनोज जरांगे यांनी दवाखान्यात भरती व्हायलाच हवे, असे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. त्यावर मनोज जरांगे यांनी देखील शब्द मोडणार नसल्याचे सांगितले.

पत्रकार परिषदेमधील व्हायरल संवादावर देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्टीकरण दिले. देवेंद्र फडणवीस मी आणि अजित पवार यांच्यात पत्रकार परिषदेबद्दल चर्चा सुरू होती. त्याचा शेंडा आणि बुडूक काढून माध्यमांनी मधले दाखवले, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. माध्यमांवर आमचा विश्वास आहे, पण त्यांनीच विश्वासघात करु नये, असे देखील मुख्यमंत्री म्हणाले. मनोज जरांगे यांनी पुढील दोन ते तीन दिवस दवाखान्यात उपचार घेण्याची विनंती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.काही लोक इतर जातींमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्यासाठी सरकारचे पूर्ण प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. इतर समाजाने समजून घेण्याची गरज असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. मराठा समाज अतिशय शिस्तप्रिय आहे. असे असताना झालेला लाठीचार्जमुळे गालबोल लागले. यात ज्यांचा दोष होता, त्यांना निलंबीत केले आहे. इतकेच नाही तर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील जाहीर माफी मागितली आहे. घटनेबद्दल मलाही खंत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. ज्याचा हेतू शुद्ध, प्रामाणिक असतो, त्याच्याच मागे जनता उभी राहत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. मी उपोषण सोडण्याची विनंती केली, आणि तुम्ही ती मान्य केली, या बद्दल मी आपले आभार मानत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मनोज जरांगे स्वत:साठी नाही तर समाजासाठी लढतोय. त्याने कधीही स्वत:च्या फायद्यासाठी कोणताच प्रश्न मांडला नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मनोज जरांगेला मनापासून शुभेच्छा देत अभिनंदन करत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. जीव गेला तरी चालेल, पण मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय शांत बसणार नाही. सरकारचा एक महिन्याचा प्रस्ताव होता, समाजाच्या वतीने मी दहा दिवस जास्त देतो, पण मराठा समाजाला आरक्षण दिल्याशिवाय मागे हटणार नाही, असे मत मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले आहे. मराठा समाजाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानत असल्याचे मनोज जरांगे यांनी सांगितले. मराठा समाजाला एकनाथ शिंदेच न्याय देऊ शकतात, असा मला विश्वास होता. असे मतही मनोज जरांगे यांनी व्यक्त केले. धाडसी निर्णय घेण्याची क्षमता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात असल्याचेही मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील यांचे वडील देखील उपोषण स्थळी दाखल झाले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांना देखील ज्युस देण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ज्युस घेत मनोज जरांगे यांनी सुरू केलेले उपोषण अखेर सुटले आहे. मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्यानंतर मनोज जरांगे यांनी अखेर उपोषण सोडले. मुख्यमंत्री यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत, मंत्री गिरीश महाजन, राधाकृष्ण विखे पाटील, रावसाहेब दानवे, संदीपान भुमरे, अर्जुन खोतकर यांच्यासह शासनाचे अधिकारी देखील चर्चेसाठी उपस्थित आहेत.

### सरकार अरक्षणाबाबत गंभीर

» केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे आणि मंत्री गिरीश महाजन हे उपोषणस्थळी आंतरवाली सराटी गावात दाखल झाले होते. ते म्हणाले की, मनोज जरांगे यांच्या टीमसोबत आम्ही चर्चा केली आहे. आमच्यातील चर्चा समाधानकारक झाली आहे. राज्य सरकार अरक्षणाबाबत गंभीर आहे. आजच्या चर्चेनंतर जे मुद्दे समोर आले त्या मुद्द्यांवर आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी चर्चा करून निर्णय घेणार असल्याचे रावसाहेब दानवे यांनी सांगितले आहे.

# शिंदेंसोबत न जाता फडणवीस राजस्थानला का गेले?

## फडणवीस मराठा आरक्षणाची जबाबदारी झटकण्याच्या प्रयत्नांत

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिंदेचे आमदार जर अपात्र ठरले तर फडणवीस मुख्यमंत्री होतील, त्यावेळी ते म्हणतील की एकनाथ शिंदेनी आश्वासन दिले होत, असे सांगून फडणवीस मोकळे होतील, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी देवेंद्र फडणवीसांना टार्गेट केले आहे.**

मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट घेतली. त्यानंतर जरांगेंनी उपोषण सोडले.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित नव्हते, यावरुन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी फडणवीसांना लक्ष्य केले आहे. नाना पटोले म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षणाचे आश्वासन देणारे देवेंद्र फडणवीस हे मनोज जरांगे पाटलांचे उपोषण सोडवायला मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसोबत न जाता राजस्थानला का गेले?.





शिंदे गटाचे आमदार अपात्र ठरले तर फडणवीस मराठा आरक्षणाची जबाबदारी झटकतील,अशी शक्यता पटोले यांनी व्यक्त केली आहे. नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने देशातील जनतेला फसवले आहे. 2014 साली नरेंद्र मोदी यांनी खोटी आश्वासने देऊन सत्ता मिळवली व सत्तेत येताच आश्वासनांना हरताळ फासला. यवतमाळमध्ये 'चाय पे चर्चा' करताना मोदींनी भाजपाचे सरकार आले तर शेतकऱ्यांचा खर्च कमी करेन, उत्पन्न दुप्पट करेन व पहिली सही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची करेन असे आश्वासन दिले होते. प्रत्येकाच्या बँक खात्यात 15 लाख देणार, दरवर्षी 2 कोटी रोजगार देणार अशी आश्वासने दिली आणि सत्तेत आल्यानंतर मात्र हा तर निवडणुकीतील 'जुमला' होता असे सांगून जनतेची फसवणूक केली. आता या भाजपाला असा 'जुमला' दाखवा की पुन्हा सत्तेत येणार नाहीत, असे आवाहन महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. शिवसेना आमदारांच्या अपात्रतेसंबंधीच्या विधानसभा अध्यक्षांपुढील सुनावणीला गुरुवारी सुरुवात झाली.

आजच्या सुनावणीत शिंदे गटाने ठाकरे गटावर दस्तऐवज देण्यात कसूर होत असल्याचा आरोप केला.

त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी 2 आठवडे लांबणीवर टाकण्यात आली. दरम्यान, ठाकरे गटाने या प्रकरणाचा फैसला शिंदे गटाला घरी पाठवणारा असेल, असा ठाम विश्वास व्यक्त केला. तसेच सध्या केवळ वेळकाढूपणा सुरू असल्याचा आरोपही केला.

### मराठा आरक्षणविषयक एकमत

» मराठा आरक्षणविषयक सर्वपक्षीय बैठकीनंतर सह्याद्री अतिथिगृह येथे पत्रकार परिषदेपूर्वी आपला आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचा माईकवरील संवाद 'सोशल मीडीया'वरून चुकीच्या पध्दतीने संपादित करुन फिरविणे अत्यंत खोडसाळपणाचे आहे. तसेच मराठा आरक्षणाबाबत पहिल्यांदाच अशा सर्व पक्षांच्या नेत्यांना एकत्र बोलावून या विषयी त्यांचे एकमत घेण्यात आले आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

# आघाडीला सनातन संपवण्याची इच्छा!

## » बीनामध्ये म्हणाले-गांधींचे अखेरचे शब्द होते हे राम!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी सागर येथील बीना रिफायनरी येथे 50 हजार कोटी रुपयांच्या पेट्रोकेमिकल प्लांटची पायाभरणी केली. रिफायनरीपासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या हडकलखाटी गावात सभेला संबोधित करताना ते म्हणाले की, घमंडिया आघाडीला सनातन संपुष्टात आणायची इच्छा आहे. गांधीजींचे अखेरचे शब्द हे राम..असे होते, ते आयुष्यभर सनातनच्या बाजूने होते, असे मोदी म्हणाले.**

बुंदेलखंडमध्ये काँग्रेसने जनतेला वीज, पाणी, रस्ते या सुविधांसाठी तळमळत ठेवले होते, असेही मोदी म्हणाले. मोदींनी 1800 कोटी रुपयांच्या औद्योगिक प्रकल्पांची पायाभरणी केली. यामध्ये नर्मदापुरमचे ऊर्जा आणि नवीकरणीय ऊर्जा उत्पादन क्षेत्र, आयटी पार्क-3 आणि 4 इंदूर, मेगा इंडस्ट्रियल पार्क रतलाम, 6 इंडस्ट्रियल पार्क (नर्मदापुरम, गुना, शाजापूर, मौगंज, आगर-माळवा आणि मकसी) यांचा समावेश आहे. 6 महिन्यांतील पंतप्रधानांचा हा मध्य प्रदेशचा सहावा दौरा आहे. 12 ऑगस्ट रोजी त्यांनी सागर येथे संत रविदास मंदिराची पायाभरणी केली होती. बुंदेलखंडची भूमी ही शूरवीरांची भूमी आहे. भूमीला बीना-बेतवाचे वरदान आहे. एका महिन्यात दुसऱ्यांदा सागरला येण्याचे आणि तुम्हा सर्वांना भेटण्याचे सौभाग्य मला मिळाले. ही संधी दिल्याबद्दल मी शिवराज सरकारचे अभिनंदन करतो. संत रविदासजींच्या त्या भव्य स्मारकाच्या निमित्ताने गेल्या वेळी मी तुमच्यामध्ये आलो होतो.

आज मला अनेक प्रकल्पांचे भूमिपूजन करण्याची संधी मिळाली ज्यामुळे मध्य प्रदेशच्या विकासाला नवी चालना मिळेल. या प्रकल्पांमुळे या भागाच्या औद्योगिक विकासाला नवी ऊर्जा मिळणार आहे. या प्रकल्पांवर केंद्र सरकार 50 हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च करणार आहे. तुम्ही कल्पना करू शकता की 50 हजार कोटी रुपये म्हणजे काय? आपल्या देशातील अनेक राज्यांचे वर्षभराचे बजेट एवढी रक्कम भारत सरकार आज एका कार्यक्रमासाठी खर्च करते. यावरून मध्य प्रदेशसाठी आमचे संकल्प किती मोठे आहेत हे दिसून येते. या सर्व प्रकल्पांमुळे आगामी काळात मध्य प्रदेशातील हजारो तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे.



हे प्रकल्प गरीब, मध्यमवर्गीय कुटुंबांची स्वप्ने पूर्ण करणार आहेत. बीना रिफायनरी आणि इतर अनेक सुविधांच्या विस्तारासाठी मी पायाभरणी करण्यास तयार आहे. त्याबद्दल मी मध्य प्रदेशातील करोडो जनतेचे अभिनंदन करतो. मित्रांनो, स्वातंत्र्याच्या या अमृतकाळात देशातील प्रत्येक नागरिकाने भारताला विकसित करण्याचा संकल्प घेतला आहे. हा संकल्प साध्य करण्यासाठी भारताने स्वावलंबी होणे आवश्यक आहे. परदेशातून किमान वस्तू आयात करायला हव्या. आज भारत बाहेरून केवळ पेट्रोल आणि डिझेल आयात करत नाही तर पेट्रोकेमिकल उत्पादनांसाठी आपल्याला इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. आज बीना रिफायनरीमध्ये पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्सची पायाभरणी झाली आहे, अशा वस्तूंच्या उत्पादनात भारताला स्वावलंबी बनवण्याचे काम करेल. प्लास्टिकचे पाईप, बादल्या-मग, खुर्च्या-टेबल, पेंट्स, पॅकिंग साहित्य, वैद्यकीय उपकरणे यामध्ये पेट्रोकेमिकल्सचा मोठा वाटा असतो हे अनेकांना माहिती नाही. बीना येथे उभारण्यात येणाऱ्या या संकुलामुळे हा संपूर्ण परिसर विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचणार आहे. तेच मी तुम्हाला हमी देण्यासाठी आलो आहे. नवीन उद्योग येथे येतील. शेतकरी आणि लघुउद्योजकांना केवळ मदत मिळणार नाही, तर सर्वात मोठी गोष्ट म्हणजे तरुणांना रोजगाराच्या हजारो संधीही मिळणार आहेत. नवीन भारतात उत्पादन क्षेत्राचाही कायापालट होत आहे.

देशाच्या गरजा वाढत आहेत तशा गरजा बदलत आहेत. उत्पादन क्षेत्राचे आधुनिकीकरण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. याच विचारातून आज येथील कार्यक्रमात खासदाराच्या दहा नवीन औद्योगिक प्रकल्पांच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले, 'G-20 च्या ऐतिहासिक यशानंतर पंतप्रधान आज येथे आले आहेत. पीएम मोदी जगाच्या कल्याणासाठी काम करत आहेत. आपले चांद्रयान चंद्रावर उतरले. शास्त्रज्ञांना विनम्र अभिवादन, पंतप्रधानांना विनम्र अभिवादन. पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्सच्या बांधकामामुळे बुंदेलखंडचे चित्र बदलेल. पेट्रोकेमिकल प्रकल्प आणि औद्योगिक प्रकल्प 4 लाख रोजगाराच्या संधी निर्माण करतील. मुख्यमंत्री म्हणाले, 'काँग्रेसने नेहमीच बुंदेलखंडला कोरडे ठेवले. पण, केन-बेतवा प्रकल्प मंजूर झाल्याचा मला आनंद आहे. यामुळे बुंदेलखंडमधील 20 लाख एकर जमीन सिंचनाखाली येईल. केन-बेटवाच्या भूमिपूजनासाठीही पंतप्रधानांनी येथे यावे, अशी विनंती आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली

» केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी म्हणाले, '2014 पूर्वी भारतातील 45 टक्के कुटुंबांना गॅस सिलिंडर मिळत नव्हते. रांगेत उभे राहावे लागले. आज देशभरात 32 कोटी गॅस सिलेंडर कनेक्शन आहेत. विकसित देशांमध्ये कच्चे तेल, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती 30 ते 50 टक्क्यांनी वाढल्या आहेत. शेजारील देशांमध्ये किंमती 60 ते 70% वाढल्या आहेत. पीएम मोदींनी येथे अशी पावले उचलली की पेट्रोलचे दर 5% आणि डिझेलचे दर 0.2% ने कमी केले.

# ईडी-ईडी क्या है? ईडी का मतलब अदाणीजी!

## » भाजपावर टीका करत काँग्रेसने आणलेलं नवं गाणं व्हायरल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात मोदी सरकार आहे आणि विरोधकांना म्हणजेच इंडिया आघाडीला वेध लागले आहेत ते २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचे. या आघाडीच्या तीन बैठका पार पडल्या आहेत. आता रॅलीज आणि प्रचारसभाही सुरू होतील. अशात काँग्रेसने ईडीचा मुद्दा उचलून धरत मोदी सरकारवर एका गाण्याच्या माध्यमातून टीका केली आहे.**

सौदागर या सिनेमात एक गाणं आहे इलू इलू नावाचं.. त्याची चाल घेऊन काँग्रेसने ईडी ईडी क्या है? ये ईडी ईडी? अशा ओळी रचत गाणं तयार केलं आहे. या गाण्यात काही लोक मस्त तयार होतात, त्यांच्या हातात मै ईडी हूँ हा बोर्ड असतो. त्यानंतर गरीबांवर ते कशा धाडी मारत फिरतात ते दाखवण्यात आलं आहे. त्यानंतर शेवटी ओळी येतात ईडी का मतलब मोदीजी, ईडी का मतलब अदाणीजी, ईडी का मतलब बीजेपी. हे सांगत असताना ज्यांच्यावर धाडी मारल्या आहेत ते सगळे गरीब लोक या लोकांना मारतात असा आशय असलेला हा व्हिडीओ आहे. विनोदी ढंगाने हे गाणं तयार करुन सोशल मीडियावर




पोस्ट करण्यात आलं आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही हा व्हिडीओ पोस्ट केला आहे. देशात मोदी सरकार आल्यापासून ईडी आणि सीबीआय यांच्या धाडी वाढल्या आहेत अशी टीका या सरकारवर कायमच केली गेली आहे. ईडी, सीबीआय आणि शासकीय यंत्रणांचा वापर करून भाजपाचं सरकार ज्या ठिकाणी नाही त्या ठिकाणी अस्वस्थता, अराजक निर्माण करायचं. तिथे फोडाफोडी करायची आणि मग भाजपाचं राज्य आणायचं असे आरोप विरोधक भाजपावर करत आले आहेत. त्या अनुषंगानेच आता काँग्रेसने ईडी ईडी क्या है हे गाणं तयार केलं आहे. काँग्रेसने प्रचाराच्या उद्देशानेच हे गाणं आणि हा व्हिडीओ आणला आहे. आता भाजपाकडून याला कसं उत्तर दिलं जाणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

### राहुल गांधी यांनीही हा व्हिडीओ पोस्ट केला

» सौदागर या सिनेमात एक गाणं आहे इलू इलू नावाचं.. त्याची चाल घेऊन काँग्रेसने ईडी ईडी क्या है? ये ईडी ईडी? अशा ओळी रचत गाणं तयार केलं आहे. या गाण्यात काही लोक मस्त तयार होतात, त्यांच्या हातात मै ईडी हूँ हा बोर्ड असतो. त्यानंतर गरीबांवर ते कशा धाडी मारत फिरतात ते दाखवण्यात आलं आहे. त्यानंतर शेवटी ओळी येतात ईडी का मतलब मोदीजी, ईडी का मतलब अदाणीजी, ईडी का मतलब बीजेपी. हे सांगत असताना ज्यांच्यावर धाडी मारल्या आहेत ते सगळे गरीब लोक या लोकांना मारतात असा आशय असलेला हा व्हिडीओ आहे. विनोदी ढंगाने हे गाणं तयार करुन सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आलं आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही हा व्हिडीओ पोस्ट केला आहे.

# गोविंदाची होणार चौकशी

गोविंदा हा बॉलिवूडचा सदाबहार, लोकप्रिय अभिनेता. गोविंदाने आजवर विविध सिनेमांमधून भुमिका साकारुन प्रेक्षकांचं मनोरंजन केलंय. पण आता गोविंदाविषयी एक वेगळीच बातमी समोर येतेय. ती म्हणजे १००० कोटींच्या एका घोटाळ्यात गोविंदाची चौकशी होणार आहे ओडिशा आर्थिक गुन्हे शाखा (EOW) ने 13 सप्टेंबरला सांगितले की ते भारतातील 1,000 कोटी रुपयांच्या ऑनलाइन पोंझी घोटाळ्या संदर्भात गोविंदाची चौकशी करतील. अधिकाऱ्यांनी सांगितले की, अनेक देशांमध्ये ऑनलाइन उपस्थिती असलेली सोलर टेक्नो अलायन्स (STA-TOKEN) बेकायदेशीरपणे क्रिप्टो गुंतवणुकीत घोटाळा करत असल्याचे उघड झाले आहे. बॉलीवूड अभिनेता गोविंदाचे नाव ऑनलाइन पॉन्झी घोटाळ्यात EOW ने चौकशीसाठी हायलाइट केले आहे. अभिनेत्याने काही प्रमोशनल व्हिडिओंमध्ये क्रिप्टो - पोंझी कंपनीच्या ऑपरेशन्सचे समर्थन केले होते. ईओडब्ल्यूचे महानिरीक्षक जे एन पंकज यांनी TOI ला सांगितले की, "जुलैमध्ये गोव्यात STA च्या भव्य समारंभात सहभागी झालेल्या आणि काही व्हिडिओंमध्ये कंपनीची जाहिरात करणाऱ्या फिल्मस्टार गोविंदाची चौकशी करण्यासाठी आम्ही लवकरच एक टीम मुंबईला पाठवू. गोविंदा या प्रकरणात संशयित किंवा आरोपी नाही. ज्येष्ठ अभिनेते संशयित किंवा आरोपी नाहीत. गोविंदाची नेमकी भूमिका तपासानंतरच स्पष्ट होईल. अधिकारी म्हणाले, "जर आम्हाला आढळले की त्यांची भूमिका त्यांच्या व्यावसायिक करारानुसार केवळ उत्पादनाच्या समर्थनापुरती मर्यादित होती.



# सोनाली ओमकार भोजने एकत्र!

हास्यजत्रा फेम ओंकार भोजने सर्वांचा आवडता अभिनेता. ओंकारने हास्यजत्रा सोजल्यावर तो चला हवा येऊ द्या मध्ये झळकला. याशिवाय त्याला अनेक सिनेमांची ऑफर मिळाली. बॉईज, सरला एक कोटी अशा सिनेमांमध्ये ओंकार झळकला. आता ओंकारचा आणखी एक नवा मराठी सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा सिनेमा म्हणजे शॉर्ट अँड स्वीट. या सिनेमाची नुकतीच घोषणा झालीय. गणेश कदम दिग्दर्शित 'शॉर्ट अँड स्वीट' चित्रपटाचे पोस्टर आज प्रसिद्ध करण्यात आले. या चित्रपटात एका बुटक्या व्यक्तीची कथा संवेदनशीलपणे रेखाटण्यात आली असून या पहिल्या पोस्टरमध्ये ही बाब अत्यंत ठळकपणे अधोरेखित होते. या पोस्टरच्या प्रदर्शनानंतर या चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे. सोनाली कुलकर्णी, श्रीधर वत्सर, हर्षद अटकरी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाच्या या पोस्टरमध्ये हे कलाकार दिसत आहेत. त्यातील नायक श्रीधर वत्सर एका टेबलावर उभा राहून सोनाली कुलकर्णीच्या गालाजवळ आपले ओठ नेतो असे या पोस्टरमध्ये दिसते. या दृश्यातून चित्रपट रंजक आणि वेगळ्या धाटणीचा आहे, हे अधोरेखित होते. त्यामुळे या चित्रपटाची चर्चा चित्रपट रसिक आणि चित्रपट क्षेत्रामध्ये सुरु झाली आहे. याआधी निर्मिती कंपनीने अनेक चित्रपटांची निर्मिती केली असून त्यात मुक्ता बर्वेचा बंदिशाळा (जुन २०१९) या मराठी चित्रपटाचा समावेश असून त्याचे दिग्दर्शन मिलिंद लेले यांनी केले आहे.

# करीनाच्या घरातील नियम बदलले!

बॉलीवूडची बेबो म्हणून लोकप्रिय झालेल्या करिनानं प्रसिद्ध अभिनेता सैफ अली खानशी लग्न केलं आणि तिच्याभोवती नेहमीच वेगळीच चर्चा होत राहिली. लग्नानंतरही तिच्याविषयी वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी समोर येताना दिसतात. करिनाला तैमूर आणि जेह ही दोन मुलं आहेत. सध्या करिनाची एक मुलाखत खूपच चर्चेत आली आहे. आपल्याला जे योग्य वाटते त्यावर ठामपणे व्यक्त होणाऱ्या सेलिब्रेटींमध्ये करिनाचे नाव घ्यावे लागेल. सैफशी लग्न करण्याचा विचार, त्याला कुटूंबियांनी दिलेली साथ यावर करिनानं इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीमध्ये बिनधास्तपणे भाष्य केले आहे. तसेच तैमूर आणि जेहच्या वेगवेगळ्या आठवणीही तिनं यावेळी शेयर केल्या आहेत. तैमूरच्या त्या प्रश्नानं आमच्या घरातील तो नियम कसा बदलला हेही तिनं सांगितलं आहे. करिना कपूर ही बॉलीवूडमधील प्रसिद्ध सेलिब्रेटी आहे.



# रेखाला सोबत नातं तोडलं!

भानुरेखा गनेशन हे प्रसिद्ध अभिनेत्री रेखा यांचे खरे नाव. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ आपल्या सौंदर्याची आणि अभिनयाची छाप रेखा यांनी चाहत्यांच्या मनात उमटवली. त्यांचा चाहतावर्ग मोठा आहे. रेखा यांच्या विषयी जितक्या वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा होत गेल्या तेवढ्या क्वचितच एखाद्या अभिनेत्रीविषयी झाल्या असतील. हिंदी फिल्म इंडस्ट्रीमधील एव्हरग्रीन अभिनेत्री म्हणून रेखा यांचे नाव घेतले जाते. रेखाजी या त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमीच वादाच्या भोवऱ्यात सापडल्या होत्या. त्यांचे वडील जेमिनी गणेशन यांचे आणि रेखाचे नाते फारसे बरे नव्हते असे सांगितले जाते. त्याविषयी रेखा आणि तिच्या वडिलांविषयी एक गोष्ट नेहमीच सांगितले जाते. जेमिनी गणेशन यांनी १९४० मध्ये १९ वर्षांच्या आलामेलू यांच्यासोबत संसार थाटला. त्यांना चार मुली झाल्या. आलामेलू यांच्यानंतर जेमिनी आणि पुष्पावल्ली यांचे लग्न होणार अशी चर्चा होती. मात्र त्यांनी कधीही पुष्पावल्ली यांना आपली पत्नीचा दर्जा दिला नाही. पुष्पावल्ली यांना दोन मुली. एक रेखा आणि दुसरी राधा. रेखाचा जन्म झाल्यानंतर देखील जेमिनी आणि पुष्पावल्ली यांचे लग्न झाले नव्हते. लग्नापूर्वीच रेखाचा जन्म झाल्यानं जेमिनी यांच्या मनात रेखाविषयी राग तयार झाला. जेमिनी यांनी साऊथची प्रसिद्ध अभिनेत्री सावित्री यांच्या सोबत तिसरे लग्न केले. त्याचीही खूप चर्चा झाली होती. त्यांना एक मुलगा, एक मुलगी. विजया चामुंडेश्वरी आणि मुलगा सतीश कुमार. जेमिनी यांची चौथी पत्नी ज्युलियाना ही जेमिनी यांच्यापेक्षा ३६ वर्षांनी लहान होती. जेमिनी गणेशन यांच्याविषयी सांगितलं जातं की, जेव्हा रेखाचा जन्म झाला तेव्हा त्यांनी पुष्पावल्ली यांच्याशी लग्न केले नाही. तेव्हा पुष्पावल्ली या प्रसिद्ध अभिनेत्री होत्या.



# मुन्नाभाई - सर्कीट पुन्हा एकत्र!

मुन्नाभाई - सर्कीट कोणाला माहित नसतील असा माणुस आढळणे दुर्मिळ. या दोघांच्या जोडीने बॉलिवूडवर अक्षरशः धुमाकुळ उडवली. राजकुमार हिरानींच्या मुन्नाभाई एम. बी. बी. एस, आणि लगे रहो मुन्नाभाई या दोन्ही सिनेमांनी बॉलिवूडमध्ये धम्माल आणली. आता राजकुमार हिरानी मुन्नाभाई 3 च्या शुटींगला सुरुवात करणार का? अशी चर्चा आहे. एका व्हिडीओमुळे ही चर्चा सुरु झालीय. संजय दत्त आणि अर्शद वारसी ज्यांनी 2003 मध्ये मुन्ना भाई एमबीबीएस आणि 2006 मध्ये लगे रहो मुन्नाभाई या चित्रपटाच्या प्रचंड यशाचा आनंद घेतला. हे दोघे पुन्हा एकत्र आले. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये, संजय दत्त त्याच्या मुन्नाभाई अवतारात दिसत होता, चमकदार केशरी रंगाचा शर्ट त्याने परिधान केलाय. त्याच्यासोबत सेटवर राजकुमार हिरानीहीसोबत होता. बॅकग्राउंडमध्ये मुन्नाभाई टायटल ट्रॅक वाजवला जातोय. संजयला आणताच राजकुमार हिरानी म्हणतात, "अहो, मुन्ना परत आला आहे!" संजय दत्तच्या एंट्रीनंतर काही क्षणांतच अर्शद वारसी त्याच्या भूमिकेत सर्किटमध्ये प्रवेश करतो. तो हसत हसतच संजूबाबाला मिठी मारतो. व्हिडिओमध्ये चाहत्यांना राजकुमार हिरानी 'WE ARE BACK' असं म्हणतो. मुन्ना भाई M.B.B.S आणि लगे रहो मुन्ना भाई या दोन हिट चित्रपटांनंतर, तिसरा चित्रपट तयार होत असल्याची शक्यता हा व्हिडीओ पाहून निर्माण झालीय. हा व्हिडीओ पाहून अनेकांना मुन्नाभाई 3 च्या शुटींगला सुरुवात झाली असं वाटत आहे. काही वर्षांपुर्वी लगे रहो मुन्नाभाई सिनेमा चाहत्यांच्या भेटीला आला. या सिनेमानंतर काही वर्षांनी मुन्नाभाई 3 ची घोषणा झाली. ज्याचं नाव ठेवण्यात आलं मुन्नाभाई चले अमेरिका. इतकंच नव्हे मुन्नाभाई चले अमेरिका सिनेमाचा छोटासा व्हिडीओ देखील यूट्यूबवर रिलीज झाला होचा. त्यामुळे मुन्नाभाई 3 याच विषयावर आधारीत असणार की काही वेगळा असणार, याचा उलगडा लवकरच होईल. सगळेजण मुन्नाभाई 3 च्या अधिकृत घोषणेची वाट पाहत आहेत. पण याशिवाय संजय दत्त आणि अर्शद वारसी 'वेलकम टू द जंगल' नावाच्या प्रोजेक्टसाठी पुन्हा एकत्र येणार आहेत. वेलकम आणि वेलकम 2 चा बहुप्रतिक्षित सिक्वेल वेलकम टू द जंगल मध्ये अक्षय कुमार, परेश रावल, जॅकलीन फर्नांडिस, दिशा पटानी, श्रेयस तळपदे, तुषार कपूर असे कलाकार दिसणार आहेत. त्यामुळे वेलकम 3 आणि मुन्नाभाई 3 अशा सिनेमांसाठी संजय - अर्शदची जोडी पुन्हा धम्माल आणणार यात शंका नाही.



# बेन स्टोक्सने रचला इतिहास!

## » इंग्लंडकडून 'हा' पराक्रम करणारा ठरला पहिला खेळाडू

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**बुधवारी न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सने अफलातून फलंदाजी केली. चौथ्या क्रमांकावर आलेल्या स्टोक्सने किवी गोलंदाजांचा समाचार घेत वादळी खेळी केली. त्याने १२४ चेंडूत १८२ धावा केल्या, त्यात १५ चौकार आणि ९ षटकारांचा समावेश होता. स्टोक्स हा असा खेळाडू ठरला असता ज्याने इंग्लंडकडून पहिले एकदिवसीय द्विशतक केले असते मात्र, अवघ्या १८ धावांनी हुकले. स्टोक्सला जरी द्विशतक पूर्ण करता आले नसले तरी त्याने मोठा इतिहास रचला आहे. तो इंग्लंडकडून सर्वात जास्त एकदिवसीय धावा करणारा खेळाडू झाला आहे.**

स्टोक्सने केलेल्या या १८२ धावा ही इंग्लंडसाठी एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. या फॉरमॅटमध्ये १८० हून अधिक धावा करणारा तो पहिला इंग्लिश क्रिकेटर ठरला आहे. स्टोक्सने जानेवारी २०१८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८० धावांची खेळी करणाऱ्या जेसन रॉयचा विक्रम मोडला आहे. रॉयने त्या सामन्यात १५१ चेंडूंचा सामना केला, ज्यात १६ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता. इंग्लंडसाठी सर्वात मोठी खेळी खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ॲलेक्स हेल्स (१७१) तिसऱ्या, रॉबिन स्मिथ (नाबाद १६७) चौथ्या आणि जोस बटलर (नाबाद १६२) पाचव्या क्रमांकावर आहे. न्यूझीलंडच्या गोलंदाजांना गुडघे टेकायला लावणाऱ्या बेन स्टोक्सने आणखी एक कामगिरी केली आहे. एखादा संघ जेव्हा ऑलआऊट होतो तेव्हा त्यात सर्वाधिक एकदिवसीय धावसंख्या करणारा तो क्रिकेटपटू ठरला आहे. त्याने या बाबतीत महान फलंदाज सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे. सचिनने २००९ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात १७५ धावांची खेळी खेळली होती. जर या सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, नाणेफेक गमावल्यानंतर इंग्लंडची सुरुवात खराब झाली होती. डावाच्या पहिल्या चेंडूवर जॉनी बेअरस्टो (०) पॅव्हेलियनमध्ये परतला. जो रूटही (४) फारसे काही करू शकला नाही. दोघेही ट्रेंट बोल्टचे शिकार ठरले. यानंतर स्टोक्स आणि डेव्हिड मलान (९५ चेंडूत ९६ धावा, १२ चौकार आणि एक षटकार) यांनी डाव सावरला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १९८ धावांची भक्कम भागीदारी केली. ही भागीदारी बोल्टने ३१व्या षटकात तोडली. स्टोक्सने ७६ चेंडूत चौथे वन डे शतक झळकावले. हे त्याचे एकदिवसीय कारकिर्दीतील सर्वात जलद शतक आहे. स्टोक्सने कर्णधार बटलर (२४ चेंडूत ३८) सोबतघेत चौथ्या विकेटसाठी ७८ धावा आणि लियाम लिव्हिंगस्टोनला (१३ चेंडूत 11) साथीला घेत पाचव्या विकेटसाठी ४६ धावांच्या दोन छोट्या भागीदारी केल्या. स्टोक्स ज्या लयीत होता ते पाहता तो सहज द्विशतक झळकावेल असे वाटत होते. पण बोल्टने ४५व्या षटकात स्टोक्सला बोल्ड केले. बोल्टने ९.१ षटकात ५१ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. इंग्लंडचा संघ ४८.१ षटकांत ३८६ धावांत गडगडला. स्टोक्सचे हे एकदिवसीय मालिकेतील पुनरागमन आहे. २०२३च्या विश्वचषक स्पर्धेत खेळण्यासाठी त्याने गेल्या महिन्यात एकदिवसीय फॉर्मेटमधून निवृत्ती मागे घेतली. २०१९ मध्ये इंग्लंडला विश्वचषक जिंकून देण्यात स्टोक्सची महत्त्वाची भूमिका होती. अशा परिस्थितीत आगामी विश्वचषकापूर्वी स्टोक्स जबरदस्त फॉर्मात आहे ही इंग्लंडसाठी आनंदाची बाब आहे.



### स्टोक्सने 76 चेंडूत ठोकले शतक

» नाणेफेक गमावल्यानंतर इंग्लंडची सुरुवात खराब झाली होती. डावाच्या पहिल्या चेंडूवर जॉनी बेअरस्टो (०) पॅव्हेलियनमध्ये परतला. जो रूटही (४) फारसे काही करू शकला नाही. दोघेही ट्रेंट बोल्टचे शिकार ठरले. यानंतर स्टोक्स आणि डेव्हिड मलान (९५ चेंडूत ९६ धावा, १२ चौकार आणि एक षटकार) यांनी डाव सावरला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १९८ धावांची भक्कम भागीदारी केली. ही भागीदारी बोल्टने ३१व्या षटकात तोडली. स्टोक्सने ७६ चेंडूत चौथे वन डे शतक झळकावले. हे त्याचे एकदिवसीय कारकिर्दीतील सर्वात जलद शतक आहे. स्टोक्सने कर्णधार बटलर (२४ चेंडूत ३८) सोबतघेत चौथ्या विकेटसाठी ७८ धावा आणि लियाम लिव्हिंगस्टोनला (१३ चेंडूत 11) साथीला घेत पाचव्या विकेटसाठी ४६ धावांच्या दोन छोट्या भागीदारी केल्या.

# क्रिकेटला नव्या उंचीवर नेण्याचे श्रेय हरमनप्रीतला!

## » आज रोहित शर्मा जो काही आहे तो धोनीमुळेच आहे : गंभीर

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर ही टाइम १०० नेक्स्ट २०२३मध्ये स्थान मिळवणारी एकमेव भारतीय क्रिकेटपटू ठरली आहे. हरमनप्रीतने विराट कोहली, रोहित शर्मा, हार्दिक पांड्या आणि के.एल. राहुलसारख्या स्टार क्रिकेटपटूंना मागे टाकत टाइम १०० लीडर्सच्या यादीत स्थान मिळवले आहे.**

टाइमने जगभरातील १०० उदयोन्मुख नेत्यांची TIME100 NEXT 2023 यादी प्रसिद्ध केली आहे. टाईमने आपल्या यादीत १०० अशा लोकांचा समावेश केला आहे जे भविष्याला आकार देत आहेत आणि पुढच्या पिढीच्या समोर एक आदर्श नेतृत्वाची व्याख्या तयार करत आहेत. हरमनप्रीत कौरला टाइम १०० यादीतील इनोव्हेटर्स श्रेणीत स्थान मिळाले आहे. हरमनप्रीत कौर व्यतिरिक्त, टाइम १००च्या या यादीमध्ये जालेन हर्ट्स, एंजल रीझ, रोनाल्ड अकुना जूनियर, रोझ झांग, सलमा पार्लुएलो आणि सोफिया स्मिथ यांसारख्या खेळाडूंचा समावेश आहे. हरमनप्रीत कौरने तिच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेटला नव्या उंचीवर नेले आहे. हरमनप्रीतने सहा वर्षांपूर्वी २०१७च्या महिला विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ११५ चेंडूत १७१ धावांची दमदार खेळी करून आपली महानता सिद्ध केली होती. कौरच्या प्रेरणादायी



नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२२च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. हरमनप्रीत कौरने यंदाच्या महिला प्रीमियर लीगच्या संपूर्ण हंगामात मुंबई इंडियन्सचे नेतृत्वही केले आणि संघाला विजयी देखील केले.

या महिन्याच्या अखेरीस सुरू होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही हरमनप्रीत भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. अलीकडेच, बांगलादेशमधील एकदिवसीय मालिकेदरम्यान, हरमनप्रीत कौरला अंपायरवर टीका केल्याबद्दल दोन सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले आणि मॅच फीच्या ७५% दंड ठोठावण्यात आला. भारतीय महिला संघ २१ सप्टेंबरपासून आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहे. या स्पर्धेत हरमनप्रीत कौर टीम इंडियाची कमान सांभाळणार आहे. कौरच्या नेतृत्वाखालील या संघात स्मृती मंधांना, जेमिमाह रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा, यास्तिका भाटिया आणि रिशा घोष या खेळाडूंचा समावेश आहे. या भारतीय संघात युवा आणि अनुभवी अशा दोन्ही खेळाडूंचा समतोल आहे. गेल्या दोन वर्षांपासून हरमनच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने आयसीसी स्पर्धांमध्ये चांगली जरी, कामगिरी केली असली तरी भारतीय संघाला विजेतेपद मिळवता आलेले नाही. आशियाई क्रीडा स्पर्धेचे विजेतेपद जिंकून भारतीय महिला संघाचा ट्रॉफीचा दुष्काळ संपवण्याचे ध्येय असेल. भारतीय संघ आयसीसी महिला टी२० क्रमवारीच्या आधारे आशियाई क्रीडा स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीतून थेट खेळणार आहे.

### हरमनप्रीतला मॅच फीच्या 75% दंड

» हरमनप्रीत कौरने यंदाच्या महिला प्रीमियर लीगच्या संपूर्ण हंगामात मुंबई इंडियन्सचे नेतृत्वही केले आणि संघाला विजयी देखील केले. या महिन्याच्या अखेरीस सुरू होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही हरमनप्रीत भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. अलीकडेच, बांगलादेशमधील एकदिवसीय मालिकेदरम्यान, हरमनप्रीत कौरला अंपायरवर टीका केल्याबद्दल दोन सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले आणि मॅच फीच्या ७५% दंड ठोठावण्यात आला.